# जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद

अदालत रोड, औरंगाबाद–431 005

E-mail : mahaurdc@mhstate.nic.in Telephone No. : (0240)2334839


जा.क्र./आस्था/१४६८८/2024 दिनांक : 14 15 ऑक्टोबर, 2024.

## सुचना

महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्रमांक पदनि 1307/210/(54/07)–बारा, दि. 24–03–2009 चे अनुषंगाने जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद या आस्थापनेवर कंत्राटी पध्दतीने (01) पदासाठी पहारेकऱ्याची नेमणुक करावयाची असून, सदर पदावर काम करण्यास पात्र असलेल्या उमेदवाराची निवड करण्यासाठी, इच्छुक व पात्र असलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर कंत्राटी पदासाठी या कार्यालयाचे प्रचलित असलेल्या करारनाम्यातील अटी व शर्ती लागू राहतील.

| | | |
|---|---|---|
| **पदाचे नाव व पद संख्या** | : | **कंत्राटी पहारेकरी (1) पद** |
| **वयोमर्यादा** | : | **वय वर्षे 18 ते 30 वयोगट.** |
| **शैक्षणीक पात्रता** | : | **किमान 12 वी उत्तीर्ण असावा.** |
| **रहिवासी ठिकाण** | : | **उमेदवार औरंगाबाद शहरातील रहिवासी असावा.** |

सदर कंत्राटी पदावरील नेमणूक ही प्रत्येक तीन महिन्यांकरीता (माहे जानेवारी ते मार्च, माहे एप्रिल ते जुन, माहे जुलै ते सप्टेंबर, माहे ऑक्टोबर ते डिसेंबर) असेल, तसेच प्रत्येक तीन महिन्यानंतर एक/दोन दिवसांचा खंड देवून नव्याने पुढील करारनामा करणे संबंधीत उमेदवारास बंधनकारक राहील. त्यासाठी सदर कंत्राटी पदावर नव्याने काम करण्यास इच्छुक असलेबाबतचा लेखी अर्ज कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील. परंतु सदर पदावर काम करण्याची संधी द्यावयाची किंवा नाही याबाबतचे सर्व अधिकार या कार्यालयाचे राहतील.

सदर पदावर काम करणाऱ्या उमेदवारास जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद यांचे दिनांक 20–03–2018 रोजीचे कार्यालयीन आदेशामध्ये नमुद केल्याप्रमाणे, प्रतिमहा वेतन रुपये 10,000/– तसेच कामगार आयुक्त कार्यालय, मुंबई यांचेकडून जाहीर करण्यात आलेला विशेष भत्ता अनुज्ञेय राहील. त्याच प्रमाणे त्यांना भविष्यात कामगार आयुक्त, मुंबई यांचेकडून वेळोवेळी जाहीर करण्यात येणारा विशेष भत्ता अनुज्ञेय राहील.

ईच्छुक उमेदवारांनी त्यांचे अर्ज सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात त्यांचे शैक्षणिक पात्रतेच्या दस्तऐवजासह दिनांक 21/10/2024 रोजी संध्याकाळी 5:00 वाजेपर्यंत प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, अदालत रोड, औरंगाबाद–431005 या पत्यावर प्रत्यक्ष अथवा पोस्टाने पोहचतील अशा बेताने पाठवावेत. तसेच सदर अर्जाची एक अतिरिक्त प्रत स्कॅन करुन जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद च्या अधिकृत ईमेल mahaurdc@mhstate.nic.in वर देखील पाठवता येईल. विहीत मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

सदर सुचना व अर्जाचा विहित नमुना जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद च्या अधिकृत संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात यावा.

जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद. ] ( विभा प्र. इंगळे )

] प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश

दिनांक : 14 15 ऑक्टोबर, 2 0 2 4. ] औरंगाबाद.

District & Sessions Court

सत्यमेव जयते

# जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद

## विहित नमुना

जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद या आस्थापनेवर कंत्राटी पहारेकरी या पदासाठी विहित करण्यांत आलेल्या निकषानुसार मी पात्र असून सदर पदावर कंत्राटी पध्दतीने काम करण्यास इच्छुक आहे.

| | | |
|---|---|---|
| 01 | अर्जदाराचे संपुर्ण नाव | |
| 02 | अर्जदाराचा जन्म दिनांक | |
| 03 | अर्जदाराचा संपुर्ण पत्ता | |
| 04 | संपर्कासाठी भ्रमणध्वनी क्रमांक | |
| 05 | शैक्षणीक पात्रता | |
| 06 | शारिरीक दृष्टया सक्षम आहात किंवा कसे ? | |
| 07 | तुमच्या विरुध्द खटला दाखल करण्यात आला आहे का? (म्हणजे कोणत्याही न्यायालयात तुमच्या विरुध्द फौजदारी खटल्याबाबत दोषारोप पत्र दाखल करण्यात आले होते का?) | |
| | आज रोजी सदर विहीत नमुना भरतेवेळी कोणत्याही न्यायालयात, आपल्या विरुध्द फौजदारी खटला प्रकरण प्रलंबित आहे का? | |

दिनांक : / 10 / 2024

( उमेदवाराचे पुर्ण नाव व स्वाक्षरी )